RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक २८] शनिवार, फेब्रुवारी २८, २०२६/फाल्गुन ९, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ९१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक व्यकर-२०२६/प्र.क्र.४/कराधान-३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्वप्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही ;

म्हणून, आता, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ मधील कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलमे (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये, खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) नियम, २०२६ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ च्या नियम ११ मधील, उप-नियम (३) मध्ये,

(१) खंड (अ) मध्ये, "३१ मार्च" या अंक आणि शब्दा ऐवजी "१५ मार्च" हे अंक आणि शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(२) खंड (क) मध्ये, "शेवटचा दिनांक" या शब्दा ऐवजी "१५ वा दिवस" हे अंक आणि शब्द दाखल करण्यात येत आहेत ;



Scanned with OKEN Scanner

**३.** उदाहरणामध्ये :—

(१) अंक व शब्द "३१ मे" याऐवजी अंक व शब्द "१५ मे" असे बदलण्यात येतील ;

(२) अंक व शब्द "३० जून" याऐवजी अंक व शब्द "१५ जून" असे बदलण्यात येतील ;

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय कंधारे,**
शासनाचे उप सचिव.

Scanned with OKEN Scanner

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 28th February, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No.व्यकर-2026/C.R.4/Taxation-3.— Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section (*3*) of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) read with the proviso to sub-section (*3*) of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Amendment) Rules, 2026.

**2.** In rule 11 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, in sub-rule (3),-

(*1*) in clause (a), for the figures and words "31st of March" the figures and words "15th of March" shall be substituted ;

(*2*) in clause (c), for the words "last date" the figures and words "15th day" shall be substituted ;

**3.** in the Illustration,–

(*a*) for the figures and words "31st of May" the figures and words "15th of May" shall be substituted ;

(*b*) for the figures and words "30th June" the figures and words "15th of June" shall be substituted ;

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY KANDHARE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with OKEN Scanner